# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 14 July 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जूलै २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

गेल्या दहा वर्षांमध्ये देशातल्या एकूण प्रत्यक्ष कर संकलनात २७४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, २०१३-१४ ते २०२४-२५ या कालावधीत कर विभागानं दिलेल्या परताव्याच्या रकमा ४७४ टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि करदात्यांची संख्या १३३ टक्क्यांनी वाढली आहे. २०१३ मध्ये कर परतावा द्यायला सरासरी ९३ दिवस लागायचे, हे प्रमाण २०२४ मध्ये केवळ १७ दिवसांवर आलं आहे. गेल्या दशकात कर प्रशासनात झालेला हा आमूलाग्र बदल डिजिटल पायाभूत सुविधांच्या अंगीकारामुळे शक्य झाला असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून ओडिशाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौर्यात त्या भूवनेश्वर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था - एम्सच्या पाचव्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. तसंच उद्या रेवेनशॉ विद्यापीठाच्या १३व्या वार्षिक दीक्षांत समारंभातही त्या सहभागी होतील. याशिवाय कटक इथं आदिकबी सरला दास यांच्या जयंती समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार असून, २०२४ चा कलिंग रत्न पुरस्कार प्रदान सोहळा त्यांच्या हस्ते होणार आहे.

****

ऑपरेशन सिंदूर दरम्यान स्वदेशात निर्मित ब्राह्मोस क्षेपणास्त्रानं केलेल्या उल्लेखनीय कामगिरीनंतर परदेशात या क्षेपणास्त्राची मागणी वाढली असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते काल लखनौ इथं आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगभरातल्या १४ देशांनी ब्राह्मोसची चौकशी केली असून, लखनौ इथूनही ही क्षेपणास्त्र त्या देशात रवाना केली जाणार आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

****

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी १५ हजार रेल्वे इंजिनं आणि रेल्वे गाड्यांच्या ७४ हजार डब्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. रेल्वे इंजिन आणि गाड्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याच्या प्रक्रियेचा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह बिट्टू यांनी आढावा घेतला. रेल्वे डब्यांमध्ये कॅमेरे लावल्यानं प्रवाशांना अधिक सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे. प्रवाशांचा खासगीपणा जपला जावा, यासाठी हे सीसीटीव्ही कॅमेरे डब्यांच्या दरवाजाजवळ लावले जाणार आहेत.

प्रत्येक कोचमध्ये चार डोम पद्धतीचे सीसीटीव्ही कॅमेरे आणि रेल्वे इंजिनांमध्ये सहा सीसीटीव्ही कॅमेरे लावले जाणार आहेत. हे सर्व कॅमेरे उच्च क्षमतेचे आणि अत्याधुनिक असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिली. या कॅमेऱ्यांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २७ जुलैला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना येत्या २५ तारखेपर्यंत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य यावर नोंदवाव्यात असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

राज्यातल्या बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणं ही राज्य शासनाची जबाबदारी आहे; या युवकांना स्वयंरोजगाराचं साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही कौशल्य, रोजगार विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. कौशल्य विभाग, पुणे पोलीस आयुक्तालय आणि हरीभाई व्ही देसाई महाविद्यालयानं संयुक्तपणे आयोजित केलेल्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ते काल ते बोलत होते.

****

राज्यातल्या सरकारी शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, आणि खासगी अनुदानित शाळांमधील दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या तीन नियतकालिक मूल्यांकन चाचण्या घेतल्या जाणार आहेत. याबाबतचं परिपत्रक विद्या प्राधिकरणाचे संचालक राहुल रेखावार यांनी जारी केलं. येत्या सहा ते आठ ऑगस्ट

या कालावधीत प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची ही पायाभूत चाचणी घेतली जाईल.

****

जळगाव शहराजवळच्या चिंचोली इथल्या नियोजीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संकुलात, ५० खाटांच्या अतिदक्षता विभागाच्या स्वतंत्र इमारतीचं भूमिपूजन  जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते काल झालं. खासदार स्मिता वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यावेळी उपस्थित होते. हे क्रिटीकल केअर युनिट प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलं आहे. या विभागामुळे जिल्ह्यातल्या वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सुविधा आणखी सक्षम होणार आहे.

****

नवी मुंबईतल्या रबाळे इथं पोलिसांनी छापा टाकून एमडी पावडर वजन काटा आणि अडीचशे प्लास्टिक पिशव्या असा साठा जप्त करुन चार जणांना अटक केली. एका महिलेनं बेकायदेशीर अंमली पदार्थ व्यवहार सुरु केल्याची माहिती मिळाल्यानंतर तीन पोलिस अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

****

हवामान विभागाने पुढील काही दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. आज तळकोकणासह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

****